नमुना I, पीएलएल, सीएल-१,
बिआरएल (बिअर), व मायक्रोब्रुवरी
मद्यार्क / मद्य निर्माणीमध्ये
करण्यात येणार अंतर्गत बदलास
परवानगी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
शासन परिपत्रक क्र. बीपीए०८१९/प्र.क्र.१४६ (भाग-१)/राउशु-२,
दिनांक :-१८.०९.२०१९

परिपत्रक

राज्य उत्पादन शुल्क विभाग हा राज्य शासनाचा राजस्व विभाग आहेमहाराष्ट्र दारुबंदी . १९४९,कायदामधील तरतुदीनुसार मद्य, मद्यार्क उत्पादन व विक्री तसेच यासाठी लागणारे कच्चे पदार्थ यांच्याशी संबंधित विविध अनुज्ञप्त्या मंजूर करण्याचे व नियंत्रण ठेवण्याचे अधिकार या विभागास आहेतसदर क्षेत्रा .मधुन राज्य शासनास महसुल प्राप्त होतो. या क्षेत्रातील उद्योगास वेगवेगळया परवानग्या मिळण्यास विलंब होत असल्याच्या सुचना अशा .निवेदन प्राप्त होत आहेत/ अडचणींमुळे उद्योगाच्या कार्यप्रणालीवर पर्यायाने शासनाच्या महसुलावर विपरीत परिणाम होत असल्याचे निदर्शनास येत आहे. गतीमान प्रशासन व उद्योगधंद्यांना Ease of Doing Business या धोरणांतर्गत कालबाहय नियम व प्रचलित पध्दतीमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे असे जाणवते.

त्याअनुषंगाने शासनाने स्थापन केलेल्या कार्यगटाच्या शिफारशी स्विकारण्यात आल्या असुन पुढील प्रमाणे सुधारित सुचना देण्यात येत आहेत.

| | अंतर्गत बदलाचे प्रकार | प्रदान करण्यात येणारे अधिकार | |
|---|---|---|---|
| | | पीएलएल/फॉर्म आय/ बिआरएल (बिअर) | सीएल-१ |
| १ | मद्य/ मद्यार्क निर्माणीत मशीनरीच्या किंवा मद्य निर्मितीच्या प्रक्रीया बदल किंवा फेरफार करण्यास परवानगी | शासन | आयुक्त |
| २ | मद्य/ मद्यार्क निर्माणीमधील जुन्या क्षमतेच्या टाक्या काढुन नविन क्षमतेच्या टाक्या (क्षमतेमध्ये बदल होत असल्यास) बसविण्यास परवानगी. | शासन | आयुक्त |

| | अंतर्गत बदलाचे प्रकार | प्रदान करण्यात येणारे अधिकार | |
|---|---|---|---|
| ३ | मद्य /मद्यार्क निर्माणीमध्ये बांधकाम करणे ( गोडाऊन, पोटमाळा, बाटलिंग हॉल) | शासन | आयुक्त |
| ४ | मद्य/मद्यार्क निर्माणीमधील जागा कमी अथवा जागा वाढवून देणे | शासन | आयुक्त |
| ५ | मद्य/मद्यार्क निर्माणीमध्ये बॉटलिंग लाईन/ कन्वेअर बेल्ट बसविणे | शासन | आयुक्त |
| ६ | मद्य/मद्यार्क निर्माणीमध्ये प्रयोगशाळा/ अर्क व स्वाद रुमचे बांधकाम इ. करणे | शासन | आयुक्त |
| ७ | मद्य / मद्यार्क निर्माणीमध्ये नविन आर. ओ. प्लांट बसविणे | आयुक्त | |
| ८ | राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या प्रभारी अधिकारी यांचे कार्यालय, होल्डींग टाक्या इ. चे इतरत्र स्थलांतर करणे | आयुक्त | |
| ९ | शासन मान्यतेनुसार पुर्वी मंजूर करण्यात आलेल्या बॉटलिंग लाईन, गोडावून, टाक्या, शटर, कार्यालय व इतर घटकाकडून काही कारणास्तव विहित मुदतीत पुर्ण न झाल्यास पुन्हा मंजूर करण्याचे अधिकार | आयुक्त | |
| १० | डिनेचर्ड रुम बांधणे. | आयुक्त | |
| ११ | स्लज सेटलिंग टँक बांधणे. | आयुक्त | |
| १२ | पेसो किंवा तत्सम इतर प्राधिकरणाच्या निकषांनुसार आवश्यक बदल करणे | आयुक्त | |
| १३ | मद्य/मद्यार्क टँकचा तात्पुरत्या स्वरुपात दुसऱ्या प्रकारच्या मद्यार्क/मद्य साठवणुक तसेच इतर प्रयोजनाकरिता वापर करण्यास परवानगी (क्षमतेमध्ये बदल न करता एका वित्तीय वर्षात ३ महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी किंवा कायमस्वरुपी असल्यास) | आयुक्त | |
| १४ | मद्य/ मद्यार्क निर्माणीमधील एखाद्या खोलीचा / गोडाऊनचा वापर तात्पुरत्या स्वरुपात (हंगामी कारणामुळे) मद्य /मद्यार्क/ बिअर साठवणुकीकरिता परवानगी देणेबाबत. | संबंधित विभागीय उप आयुक्त | |
| १५ | मद्य/मद्यार्क टँकचा तात्पुरत्या स्वरुपात दुसऱ्या | संबंधित अधीक्षक | |

| | अंतर्गत बदलाचे प्रकार | प्रदान करण्यात येणारे अधिकार |
|---|---|---|
| | प्रकारचे मद्य/मद्यार्क साठवणुकीसाठी वापर करण्यास परवानगी (एका वित्तीय वर्षात ३ महिन्याकरिता असल्यास) | |
| १६ | मद्य/मद्यार्क निर्माणीमध्ये आपत्कालीन दरवाजा बसविणे तसेच मंजूर असलेला आपत्कालीन दरवाजा फेरफार करणे. | संबंधित अधीक्षक |
| १७ | मद्य/ मद्यार्क निर्माणीमध्ये लोडींग शटर, विज जोडणी, नळ जोडणे, रंग देणे इ. स्वरुपाचे किरकोळ बदल करणे. | संबंधित अधीक्षक |
| १८ | सर्व मद्य/मद्यार्क निर्माणीत स्वच्छता गृह, अभ्यागत कक्ष, इ. बांधकाम करणे. | संबंधित अधीक्षक |
| १९ | सर्व मद्य/ मद्यार्क निर्माणीस कंपाऊंड वॉल इ. बांधणे. | संबंधित अधीक्षक |
| २० | मायक्रोब्रुव्हरी / रेस्ट्रॉरंट ब्रुव्हरी मधील सर्व अंतर्गत बदल करणे तसेच वार्षिक क्षमता २ लाख लि. पर्यंत वाढविणे | संबंधित अधीक्षक |

उपरोक्त प्रमाणे परवानग्या संबंधित प्राधिकाऱ्यांनी विहीत वेळेत मंजुर कराव्यात व अशा परवानग्या देताना त्यांना दिलेल्या अधिकारांचे उल्लंघन होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

(पु. हि. वागदे)

सह सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
३) सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
४) निवडनस्ती, राज्य उत्पादन शुल्क-२, गृह विभाग.
५) सर्व पीएलएल/ बीआरएल (बिअर)/सीएल-१/फॉर्म I आयअनुज्ञप्तीधारक, मायक्रोब्रुवरी घटक. (मार्फतः- आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.)